''मनातलं सार कानात सांगणारा
दोस्ती, दुश्मनी, प्रेम प्राणाच्या ज्योतीने जपून,
पाहणाऱ्याला लाजवायला लावणारा
माणुसकीच्या मळ्यात कसणारा
पण कधी कधी दुबळ्यापेक्षा,
हृदयातल्या माणसांसाठी हळवा होणारा
असा माझा जीवस्य्, कंठस्य् मित्र
अंतःकरणात ठांण मांडून बसलेला
सरवा अजय यासं... ''

# मनोगत

एम. ए. झाल्यानंतर एम.फिल. करण्याचा सल्ला माझे आदरणीय गुरूवर्य प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठांनी दिला. पूर्वीपासूनच मला काव्य वाचनाची आवड असल्यामुळे काव्याचाच विषय निवडावा असे वाटले. त्यात काव्याचा विषय निघताच हिरेमठ सरांनी 'रा. ना. पवारांचे नाव सूचविले. सोलापूरचा मानकरी असलेला, हजारो चांगल्या कविता लिहूनही उपेक्षित राहिलेल्या कवीच्या जीवनाचा व कवितेचा अभ्यास करताना त्यांचा स्वाभिमानी स्वभाव, मोडेन पण वाकणार नाही असा बाणा, राष्ट्रप्रेमाने भारदस्त झालेले समाजातील विषमतेची आग ओकणारे , तसेच शालीन शृंगारात रमणारी कविता आणि 'प्रामाणिकपणे' व 'माणुसकी'ने जगणारा व असा संदेश प्रकट करणारे काव्य. अशा विविध गुणवैशिष्ट्याने नटलेले कवित्व पाहून भारावून गेलो आणि ''रा. ना. पवार यांच्या कवितेचा अभ्यास'' असा विषय सरांशी चर्चा करून निवडला.

रा. ना. पवारांविषयी माहिती मिळविण्याचा फार मोठा वाटा त्यांचा मुलगा माधव पवार यांचा आहे. मी गेल्यानंतर सर्व कामे सोडून माहिती मिळविण्यास रा. ना. पवारांच्या मित्राकडे, वृत्तपत्राच्या कार्यालयाकडे माझ्या बरोबर निःसंकोचपणे. जी खोली रा. ना. पवारांच्या साहित्याने भरली आहे, त्या खोलीची चावी संपूर्ण काम संपेपर्यंत त्यांनी माझ्याकडे दिली. इतका विश्वास त्यांनी माझ्यावरती ठेवला. मी त्यांच्याकडे गेल्यानंतर आपल्याच कुटुंबातील एक व्यक्ती समजून श्री माधव व सौ. चारुलता वहिनी यांनी मदत केली. या लघु-प्रबंधाच्या निमित्ताने श्री माधव पवार व सौ. चारुलता वहिनीसारखी प्रेमळ माणसं मला भेटली. त्यांचे आभार मानून ऋणमुक्त होण्यापेक्षा त्यांच्या सदैव ऋणातच राहण्यात मला आनंद होईल.

हा लघु-प्रबंध सादर करण्यात माझे मार्गदर्शक व आदरणीय गुरूवर्य डॉ. राजेंद्र बीडकरांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून प्रबंध आखीव व रेखीव करण्यास मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. बीडकर व डॉ. हिरेमठ सरांचा माझ्या जीवनाच्या जडणघडणीत व लघु-प्रबंध सादर करण्यात सिंहाचा वाटा आहे. या प्रेमळ गुरूवर्यांचे आभार मानून ऋणमुक्त होण्यापेक्षा त्यांच्या प्रेमळ छत्राखालीच राहणे मी पसंत करीन.

एम.फिल.मुळे मला एक चांगला प्रा. सुहास पुजारी यांच्यासारखा गुरूमित्र मिळाला. आम्ही दोघे ग्रंथालयात बसून प्रबंध लिहित असताना मध्येच मी त्यांना एखादी शंका विचारली तर मनावर व

चेहऱ्यावर (त्यांच्या लिहिण्यात व्यत्यय आणल्यामुळे) कुठलाही भाव प्रकट न करता मनमोकळेपणाने व नि:संकोचपणाने माझ्या शंकेचे निरसन करायचे. असा एक जीवाभावाचा गुरूमित्र एम.फिल.मुळे मिळाल्याबद्दल मला आनंद वाटतो.

या सर्वांहून माझ्या जीवनाच्या जडणघडणीत व येथपर्यंत पोहोचण्यास माझी आई सौ. भागिरथी व वडील श्री. गोविंद यांचा फार मोठा व मोलाचा वाटा आहे. त्यांच्या विषयी जेवढे लिहावे तेवढे कमीच आहे. मी घरात मोठा असूनही माझे एम.ए. झाल्यानंतर माझ्याकडून नोकरीची अपेक्षा न करता पुढील उच्चशिक्षणासाठी मला प्रोत्साहन दिले आणि माझे उज्वल भविष्य घडविण्यासाठी माझ्या पंखांना उंच आकाशात भरारी मारण्याचे सामर्थ्य दिले. माझ्या जीवनाचे शिल्पकार असलेल्या माझ्या आई-वडिलांचे नाव माझ्या हृदयात कोरून ठेवले आहे. तसेच माझी मावशी सौ. शिला यांचाही मौलिक वाटा आहे, हे मी विसरू शकणार नाही.

माझ्या या लघु-प्रबंधाच्या अल्पशा कार्यात माझ्या गुरूवर्याबरोबरच माझ्या मित्रमंडळींचेही प्रोत्साहन मिळाले, त्यामुळेच मी या लघु-प्रबंधाचा अभ्यास पूर्ण करू शकलो. माझे मित्र अजय, चंद्रकांत, बाबासाहेब, गुलाब, शाम, धनंजय तसेच सौ. कल्पना वहिनी, सौ. चंद्रकला ताई, सौ. रतन, कु. श्वेता, कु. वनिता, कु. अनिता यांचाही मी ऋणी आहे.

तसेच संगमेश्वर महाविद्यालयातील ग्रंथालयात वेळोवेळी संदर्भ ग्रंथ देऊन सहकार्य केल्याबद्दल सौ. सुचरिता राजीव यांचाही मी ऋणी आहे.

थोड्याच अवधीत लघु-प्रबंधिकेचे संगणकीय अक्षरजुळवणीचे काम करून दिल्याबद्दल एस. के. कॉम्प्युटर्सचे श्री. उन्मेश शहाणे व सचिन सोनवणे यांचाही मी आभारी आहे.

**- कुमार गोविंद सोलनकर**